**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I*

**38**

# आपत्ती व्यवस्थापाचे विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा.डॉ. रविंद्र पुंडलिक पाटील**
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव ता.जि.धुळे

---

**प्रस्तावना :-**

मानव आणि आपत्ती यांचा संबंध अनादिकाळापासून असून त्यामुळेच मानवी जीवनात प्रचंड प्रमाणात स्थित्यंतरे घडून आलीत आणि भविष्यातही होतील. मानवाने निसर्गात केलेले हस्तक्षेप आणि त्यामुळे पर्यावरणात झालेला बिघाड यामुळे मानवास अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. एकवीसाव्या शतकात मानवाने लावलेले विविध शोध आणि मानवाचा अतातायीपणा यामुळे आपत्ती निर्माण होते. मानव निर्मिती आणि निसर्ग निर्मित असे आपत्तीचे दोन प्रकार आहेत. विशेषत: हवामानातील बदलामुळे नैसर्गिक आपत्ती आकस्मिकपण उद्भवते त्यामुळे अशा नैसर्गिक आपत्ती जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण दैनंदिन व्यवहारातही बघतो जर एखाद्या वाहनाला मोठा आपघात झाला किंवा एखादी व्यक्ती अपघातात जखमी झाली तर त्यांना उपचारासाठी त्यांचे प्राण वाचविण्यासाठी समाजातील अनेक जण धावपळ करतात. एकंदरीत मानवी संवेदनामुळेच ही सकारात्मक कृती समाजाकडूनच घडते. तसेच यामध्ये प्रशासनाच्या वतीने सुध्दा योग्य ती दखल घेतली जाते. म्हणूनच आपत्ती व्यवस्थापन आणि लोकसहभाग यांच नात खुप जवळच आहे. भूकंप, महापूर, चक्रीवादळ , अतिवृष्टी ह्या सर्व घटना नैसर्गिक आपत्तीमध्येच मोडणाऱ्या आहेत. अशा आपत्तीमध्ये होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी महाराष्ट्र आपत्ती जोखीम व्यवस्थापन अंतर्गत विभागीय व जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर केंद्र शासनाने 2005 मध्ये आपत्ती व्यवस्थापन कायदा पारित केला. याचा मुळ उद्देश नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारे नुकसान टाळणे व सर्वांना सुरक्षितता प्रदान करणे हा आहे. हा कार्यक्रम प्रशासकिय यंत्रणेकडून राबविला जात असला तरी देखील संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्वाचा आहे.

**आपत्ती व्यवस्थापनाचा अर्थ :-** "निसर्गाने किंवा मानवाने निर्माण केलेल्या संकटाचा समाज किंवा पर्यावरणावर होणाऱ्या प्रतिकुल परिणामांवर शासकीय दृष्ट्या योग्य उपाययोजना करणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापित होय." भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येक व्यक्तीस आपल्या जिवीत आणि मालमत्ता सुरक्षीत राखण्याचा अधिकार दिला आहे. त्याच बरोबर राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षितता राखणे हे प्रत्येक व्यक्ती आणि संस्थेचे मुलभूत कर्तव्य असल्यामुळे साहजिकच आपत्ती निवारण्याची जबाबदारी सरकार आणि प्रत्येक नागरिकाची आहे.

आपत्ती व्यवस्थापन या संकल्पनेत नियोजन जबाबदारीचे, जोखमीचे, कामगिरीचे व्यवहारात्मक वित्तीय संदेशवहनाचे आणि माहितीचे व्यवस्थापन इ. समावेश होतो.

आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 नुसार सातत्यपुर्ण व एकात्मिक नियोजन प्रक्रिया, व्यवस्थित रचना, सहकार्य आणि आपत्तीच्या संभाव्य धोक्याला प्रतिबंध, आपत्तीतील धोक्यांची तीव्रता कमी करणे, क्षमता सबलीकरण पूर्वतयारी, तत्पर प्रतिसाद, आपत्ती परिणामांची तिव्रता व्यापकता पडताळून पाहणे, स्थलांतर मदत व बचाव कार्य पुनर्वसन व पुनर्रचना इत्यादी आवश्यक किंवा उपयुक्त उपायांची अंमलबजावणी म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.

**संशोधनाचे उद्दिष्ट्य** 1) आपत्ती व्यवस्थापनाचे अध्ययन करणे.

**संशोधनाचे गृहितक** 1) आपत्ती व्यवस्थापनामुळे आपत्तीची तिव्रता कमी होते.

**संशोधन पध्दती –** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे यात विविध संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, शासकिय अहवाल, वेबसाईट इ. संशोधनासाठी वापर करण्यात आलेला आहे.

**विश्लेषण :-**

**आपत्ती व्यवस्थापनाची गरज –** एखादी व्यक्ती शारीरिक मानसिक व भौतिक दृष्ट्या कोणत्याही संकटावर मात करण्यासाठी तयार असला तर आकस्मात आलेल्या संकटांनी खचून न जाता तो उत्तम मनोबलाच्या आधारे आलेल्या आपत्तींना यशस्वीपणे सामोरे जाऊ शकतो आपत्तींना तोंड देण्यासाठी आपत्ती कशा व कोणत्या स्थितीत निर्माण होतात? होणाऱ्या नुकसानाची तिव्रता कमी करण्यासाठी काय उपाय योजना करता येतील? यांची माहिती करुन घेऊन आपत्ती पूर्व नियोजन काय करावे? प्रत्यक्ष आपत्तीत मानवी

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I*

वर्तन कसे असावे? नंतरची जबाबदारी काय असावी इत्यादी सर्व प्रश्नांची उत्तरे जाणून घेतल्यास आपत्तीला समर्थपणे सामोरे जाता येते.

**आपत्तीचे दोन प्रकार पडतात:**

1) **नैसर्गिक आपत्ती –** आपत्तीमध्ये अतिवृष्टी, महापूर, भूकंप, सुनामी, वादळे, हिमपात, दरड कोसळणे, नैसर्गिक रोगराई, वणवे ज्वालामुखी उद्रेक, उल्कापात, वीज कोसळणे, आवर्षण इत्यादींचा समावेश होतो.
2) **मानवनिर्मित आपत्ती –** चेंगराचेंगरी, घरगुती अपघात, आग वायुगळती इमारत कोसळणे, रेल्वे अपघात हवाई अपघात जलवाहतूक अपघात अणुभट्टी किरणोत्सर्ग युध्द, अतिरेकी कारवाया, पर्यावरण ऱ्हास, माहिती तंत्रज्ञानासंबंधी गुन्हे इत्यादीचा समावेश होतो.

आपत्ती या महत्वपूर्ण समस्यांची तिव्रता कमी करणे शक्य नसले, तरी शास्त्रीय ज्ञान वापरून उपलब्ध संसाधनांच्या सहाय्याने आपत्तीचे व्यवस्थापन करता येते. आपत्तीचे स्वरुप, क्षमता, ठिकाण, कालावधी, कारण, पूर्वकालीन क्षमता व विस्तार यांवर मनुष्यहानी, वित्तहानी, दैनंदिन व्यवहार आणि वातावरणातील परीणाम अवलबून असतो. उदा. महापूर, बॉबस्फोट, भूकंप, रोगराई यामुळे संपूर्ण जनजिवन विस्कळीत होते. आपत्तीचा संबंध विविध सामाजिक शास्त्राशी येतो. त्यामुळे संपूर्ण मानवी जीवनावर दुर्गामी परिणाम होतात. उदा. अर्थशास्त्र बाजार व्यवस्था पूर्ववत व्हायला वेळ लागतो. सामाजिक व्यवहार किंवा कार्यपुढे ढकलावी लागतात त्यात्या भागातील संपूर्ण व्यवस्थेची गती कमी होते.

**आपत्ती व्यवस्थापनाची ध्येय, उद्दिष्ट्ये –** आपत्ती व्यवस्थापनाची ध्येय, उद्दिष्ट्ये परस्परांशी निगडीत आहेत. मानवी जीवताचे रक्षण हे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख ध्येय असले तरी मानवी जीवनासाठी आवश्यकते प्राणीमात्रांचे रक्षण, संपत्ती अन्नधान्य, वस्त्र निवाऱ्याचे संरक्षण त्यात सामावलेले आहे आपत्ती व्यवस्थापनाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

1) मानवी जीवनावर कोणतीही आपत्ती ओढवू नये यासाठी प्रादेशीक वैशिष्ट्य लक्षात घेवुन निवास व्यवस्थेमध्ये लक्ष केंद्रीत करणे.
2) मानवाचे कार्य, व्यवसाय त्यातील धोके लक्षात आणून देणे.
3) आपत्ती निर्माण झाल्यावर तात्काळ मदत मिळावी यासाठी निरनिराळया संघटनाची साखळी निर्माण करून त्यातील जागृतता टिकवीणे.
4) आपत्ती काळात मानवीजीवीत हानी होऊ नये यासाठी तात्काळ मदत पोहचवणे आणि आपत्तीमधील लोकांची सुरक्षा करणे व जीवदान देणे
5) निर्माण झालेल्या आपत्तीमध्ये, वाढ होणार नाही यासाठी नियंत्रणे लादणे.
6) आपत्तीग्रस्तांचे पूनर्वसन करणे.
7) आपत्ती काळात लोकांचे मनोधैर्य खचू न देणे.
8) निर्माण झालेल्या आपत्तीचे निराकरण करण्यासाठी सर्वार्थाने प्रयत्न करणे. तसेच भविष्याकाळात पून्हा तशी आपत्ती निर्माण होणार नाही याबाबत कार्यवाही करणे.
9) मानवी जीवनासंबंधी, आत्मसाफल्याच्या गरजा, आत्मप्रतिष्ठेच्या गरजा, सामाजिक गरजा प्रेमविषय गरजा, मानसिक सुरक्षेच्या गरजा आणि शारीरिक व प्राथमिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या भावनामध्ये सहभागी होणे, त्यांना शारीरिक बळ मिळण्यासाठी त्यांचे कौतुक करून त्यांच्यामनामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांचेशी स्नेह मैत्री संपादन करणे आपत्ती पासून सुरक्षेसाठी अन्न, धान्य, वस्त्र, निवारा उपलब्ध करून देणे.




आपत्ती व्यवस्थापनामध्ये सर्वप्रथम पूर्व तयारी आवश्यक असते ती पूर्व तयारी म्हणजे संकटपूर्व व्यवस्थापन होय. जेव्हा अचानकपणे नैसर्गिक आपत्ती कोसळते तेव्हा आपत्ती निर्मिती नंतर कोणकोणत्या घटकांनी कोणकोणते कार्य करायचे तसेच संकटावर नियंत्रण कसे ठेवायचे याबद्दलचे व्यवस्थापन म्हणजे संकट काळातील व्यवस्थापन होय. संकट घडून गेल्यानंतर संकटामध्ये कोणते किती नुकसान झाले? परिणाम काय घडून आलेत? त्यावर कसे नियंत्रण ठेवायचे? परिस्थितीशी मिळेत जुळते घेऊन

भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या आपत्ती बद्दल विचार व मांडणी या सर्व व्यवस्थापनाचा समावेश संकटानंतरच्या व्यवस्थापनात होतो.

**आपत्ती व्यवस्थापनात नागरीक आणि सरकारी संस्थाचे कार्य** :- आपत्तीकाळात सर्वांनाच मदतीची आवश्यकता असते. प्रामुख्याने नागरिकांच्या आणि सामाजिक संघटनाचे कार्य महत्वपूर्ण व गरजेचे असते. सर्वच आपत्तीत सर्वप्रकारचे कार्य एकट्या सरकारकडून होणे अशक्य आहे. अशा वेळी आपत्तीकाळात महत्वपूर्ण जबाबदारी काही स्वयंसेवी संघटनाही स्विकारतात त्या स्वयंसेवी संघटनात नागरिकांचा सहभाग खुप महत्वपूर्ण असतो. या संघटनामध्ये स्वयंसेवी संघटना बरोबरच, कामगार संघटना, शैक्षणिक संस्था यात शाळा, महाविद्यालये यांचा प्रामुख्याने समावेश होतो. महाविद्यालयीन पातळीवर राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी. या सारख्या एककांचा आपत्ती निवारणात खूप मोलाचा वाटा आहे. या बरोबरच सामाजिक संस्था तसेच समाजसेवी संघटना यांचे आपत्ती काळात महत्वपूर्ण योगदान असते. आपत्तीकाळात सरकारी यंत्रणा व नागरी संस्थाकडून पुढील प्रकारचे कार्य केले जाते.

**कार्य-**

1) आपत्तीच्यावेळी संघटना प्रमुखांनी घेतलेले सर्व निर्णय बंधनकारक मानून त्यानूसार व्यवस्थापन करणे.
2) नागरीकांना त्या त्या भौगोलिक प्रदेशात उद्भवणाऱ्या भावी संकटाची माहिती देणे.
3) संकटकाळामध्ये आवश्यक त्या कार्यवाहीचे, हालचालीचे प्रशिक्षण देणे.
4) सुचना, प्रसिध्दी माध्यमे, भाषणे, दुरध्वनी शिट्या घंटानाद इ. उपलब्ध साधनाचा उपयोग करुन मदतनिसांना एकत्र करणे व आपत्तीच्या अनिष्ट परिणामांची जाणीव करून देणे.
5) आपत्ती व्यवस्थापनात आपत्तीपूर्णपणे दूर करता येत नसली तरी त्या आपत्तीची तिव्रता कमी करणे.
6) आर्थिक मदत उपलब्ध करून देणे.
7) अधुनिक वैज्ञानिक तंत्राच्या सहय्याने संकटाबद्दल पूर्व सूचना व माहिती देणे.
8) अन्न धान्य, पाणी निवास व्यवस्था उपलब्ध करणे.
9) औषधी सेवा प्रथमोउपचार, वैद्यकिय मदत उपलब्ध करून देणे.
10) आपत्तीकाळात वाहतुक व दळणवळण सुविधांचा प्रभावी वापर केला पाहिजे.
11) आपत्तीकाळात तिव्रतेनूसार प्राधान्यक्रमाने प्रश्न सोडवीणेसाठी मदत व सहकार्य करणे.
12) नागरिकांच्या मनातील भिती दूर करणे व त्यांचे मनोबल उंचावणे.
13) सार्वजनिक जाणीवेचे महत्व लक्षात घेऊन संकट काळात माहितीची सत्यता पडताळणे माहितीचा प्रचार व प्रसार करणे आणि समन्वय साधणे. अशा प्रकारे आपत्ती अचानक उद्भवत असल्यामुळे शासन शासनाची आपत्कालीन यंत्रणा व सामाजिक संघटना तसेच नागरीक जेवढ्या तत्परतेने कार्यास लागतील तेवढ्या लवकर आपत्तीची तिव्रता कमी करता येईल हे ही मात्र खरे आहे

**निष्कर्ष –**

1) आपत्ती ही आकस्मात निर्माण झालेले संकट आहे.
2) मानव आणि आपत्ती यांचा अनादिकाळापासून संबंध आहे.
3) मानवाने निर्माण केलेले हस्तक्षेप आणि त्यामुळे पर्यावरणात झालेला बिघाड यामुळे मानवास अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे.
4) 21 व्या शतकात मानवाने लावलेले विविध शोध आणि मानवाच्या आततायीपणामुळे आपत्ती निर्माण होते.
5) आपत्ती व्यवस्थापन ही शास्त्रीय व्यवस्था आहे.
6) आपत्ती व्यवस्थापनामुळे मानवाचे कार्य, व्यवसाय यातील धोके लक्षात येतात.
7) आपत्ती निर्माण झाल्यावर तात्काळ मदत मिळावी यासाठी निरनिराळ्या संघटनांची साखळी निर्माण करून त्यातील जागृतता टिकवीता येते.
8) आपत्ती व्यवस्थापनामुळे निर्माण झालेल्या आपत्तीचे निराकरण करणे सुलभ होते.

**संदर्भ –**

1) प्रा.ए.पी.चौधरी, प्रा. अर्चना चौधरी- आपत्ती व्यवस्थापन - प्रशांत पब्लिकेशन-2012.
2) डॉ.संभाजी खराट – आपत्ती व्यवस्थापन – प्रतिमा प्रकाशन, पुणे.
3) कर्नल प्र.प्र.मराठे, प्रा.गोडबोले – आपत्ती व्यवस्थापन संकल्पना आणि कृती.